# दिनांक 26/07/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 23

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील रि.स.नं.447 मधील 12 मीटर रूंदीचा विकास योजनेमधील रस्ता 9 मीटर करणेबाबत श्री.बलभीम बाबुराव जाधव व श्री.दत्तात्रय बाबुराव जाधव यांचे दिनांक 07/06/2022 रोजीच्या अर्जावर निर्णय घेणे.

नगररचना विभागाकडील अहवालानुसार विटा नगरपरिषद हद्दीतील रि.स.नं. 447 मधील 12 मीटर रूंदीचा विकास योजनेमधील रस्ता 9 मी.करणेबाबत श्री.बलभीम बाबुराव जाधव व श्री.दत्तात्रय बाबुराव जाधव यांनी दिनांक 07/06/2022 रोजीच्या अर्जाने विनंती केली आहे.अर्जदार यांची रि.स.नं 447 मध्ये 24 आर जागा असून त्यापैकी 10 आर जागा ही 12 मीटर विकास योजनेच्या रस्त्यात बाधित क्षेत्र असलेने UDCPR नुसार बांधकाम नकाशा तयार करणेस अडचण येत असलेबाबत नमुद केले आहे.

विटा शहर विकास योजना (दुसरी सुधारित) ही दिनांक 31/08/2019 रोजी झाली असून त्यानुसार अर्जदार यांच्या जागेतून 12 मीटर रूंदीचा विकास योजना रस्त्यात साधारपणे 10 आर जागा बाधीत होत आहे.श्री.जाधव यांचे अर्जानुसार प्रत्यक्ष स्थळपहाणी केली असता अर्जदार यांचा भुखंड हा विटा-मायणी रोड व 12 मीटर विकास योजना रस्ता अशा दोन रस्त्यास सन्मुख आहे.प्रत्यक्षात सदर ठिकाणी सध्या 4 मीटर रूंदीचा रस्ता अस्तित्वात आहे. उर्वरित रस्ता अद्याप विकसित झालेला नाही. तसेच 12 मीटर विकास योजना रस्त्याच्या उत्तरेस काही आर.सी.सी.स्वरूपाची घरे झालेली आहेत. अर्जदार यांनी सदर रस्ता 9 मीटर रूंदीचा झालेस 9 मीटर नुसार बाधित होणारे 809 चौ.मी.क्षेत्र TDR च्या बदल्यात नगरपरिषदेस देण्याची तयारी दर्शवली आहे. तरी अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे रस्त्यामध्ये फेरबदल केलेस अस्तित्वातील रस्त्याची जागा विकास योजना रस्त्यामध्ये समाविष्ट होऊन भुसंपादनाचा खर्च वाचणार आहे. तसेच प्रस्तावीत विकास योजना रस्ता व इमारतींमध्ये अंतर असल्याने जागा वाया जाण्याची शक्यता आहे. सदर रस्त्याची लांबी 180 मी.असलेने रस्त्याची रूंदी 12 मीटर वरून 9 मीटर केलेस वाहतुकीस अडथळा येणेची शक्यता कमी आहे तरी कार्यालयीन टिपणी दिनांक 21/07/2022 नुसार 12 मीटर ऐवजी 9 मीटर रस्ता करणेस मंजुरी देणेत येत आहे. या याकामी पुढील आवयश्क ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा